RNI Regd. No. 72105/99 ■ सातारा

मराठी माणसाचा मानदंड

■ www.rajdand.com Youtube, FB, Insta, Twitter, Koo ■ rajdandlive

# राजदंड

■ वर्ष २५, ■ अंक १८५ ■ मंगळवार, १२ मार्च २०२४ पश्चिम महाराष्ट्र ■ पाने ८ (सुप्रभात) ■ किंमत रू ५/-

# अमरावतीत ठिय्या आंदोलनाला हिंसक वळण

## आठ पोलिसांसह १५ जण जखमी



**अमरावती:** पांढरी खानमपूर येथील प्रवेशद्वाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या मागणीवरून ७ मार्चपासूनअमरावतीविभागीय आयुक्त कार्यालयावर सुरू असलेल्या ठिय्या आंदोलनाला सोमवारी सायंकाळी ५ वाजता हिंसक वळण लागले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिलेले पत्र अमान्य करीत जमावाने पोलिसांवर दगडफेक केली, त्यामुळे जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या,पाण्याचा मारा केला. तरीही आंदोलनकर्ते थांबले नाहीत अन् पोलिस वाहनांची तोडफोड केली. दरम्यान, आठ पोलिसांसह १५ जण जखमी झाल्याची माहिती आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर गावच्या प्रवेशद्वाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी पांढरी खानमपूर येथील सर्व बौद्ध बांधवांनी गावातून लाँग मार्च काढून गुरुवारी विभागीय आयुक्त कार्यालय गाठले. विभागीय आयुक्तांनी तीन दिवसांचा अवधी मागितला होता. त्यामुळे सर्व आंदोलनकर्त्यांनी तेथेच ठिय्या आंदोलन सुरू केले. गावातील एका गटाने प्रवेशद्वाराला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे, ही मागणी लावून धरली आहे. त्यावर शनिवारी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दोन्ही महापुरुषांची नावे प्रवेशद्वाराला द्यावी, प्रवेशद्वार उभारणीसाठी शासन निधी उपलब्ध करून देईल, असा तोडगा सूचविला होता. मात्र प्रशासनाने लेखी पत्र द्यावे, यावर आंदोलक ठाम होते.

दरम्यान सोमवारी विभागीय आयुक्तांकडे कमलताई गवई यांच्यासह पांढरीतील दहा महिला-पुरुषांचे शिष्टमंडळासोबत प्रदीर्घ बैठक झाली व आंदोलनकर्त्यांना पत्र देण्यात आले.

मात्र प्रशासनाचे पत्र काहींना अमान्य असल्याने आंदोलकांमध्ये धुसफूस वाढली व तणाव निर्माण झाल्याने आंदोलनाला हिंसक वळण लागले.पत्र अमान्य असल्याने वाढला तणाव

मंगळवारी जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त व जि.प.च्या सीईओ हे पांढरीला भेट देतील व दोन्ही गटाची गावात बैठक घेऊन तोडगा काढतील, अशा आशयाचे पत्र शिष्टमंडळाला दिले. मात्र, हे पत्र अमान्य असल्याने काही आंदोलनकर्त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली. विभागीय आयुक्त कार्यालयाचे गेटही तोडले व आतील वाहनांची तोडफोड केली.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर पोलीस बंदोबस्त तैनात होता. आत शिष्टमंडळासोबत चर्चा सुरू आहे, असे आंदोलनकर्त्यांना वारंवार पोलीस अधिकारी सांगत होते. दरम्यान काही जणांनी गेटच्या आत प्रवेश केला. पोलिसांवर दगडफेक केली. वाहनांची तोडफोड केली. जमावाला पांगविण्यासाठी सौम्य लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर करावा लागला. पसरत असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये. शहरात ठिकठिकाणी चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### अंबाबाई आराखड्याला जिल्हास्तरीय समितीची मंजूरी


**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरा विकास प्राधीकरणअंतर्गत करण्यात आलेल्या १४४८ कोटींच्या आराखड्याला सोमवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या ... घेश्रहर्ीिः अंबाबाई आराखड्याला जिल्हास्तरीय समितीची मंजूरीकोल्हापूर: करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरा विकास प्राधीकरणअंतर्गत करण्यात आलेल्या १४४८ कोटींच्या आराखड्याला सोमवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिली.

महापालिकेचा आराखडा व प्राधीकरणअंतर्गत आराखडा या दोन्हींमध्ये समावेश असलेली कामे व त्याची रक्कम एका आराखड्यातून वगळून ही मंजूरी देण्यात आली. लोकसभा निवडणुकीनंतर जूनमधील अर्थसंकल्पात प्राधीकरण आराखड्यासाठी निधीची तरतूद करण्याचा प्रयत्न करू अशी माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सोमवारी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात अंबाबाई मंदिर विकास प्राधीकरण आराखड्याबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक झाली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बैठकीला जिल्हाधिकारी अमोल येडगे, आमदार जयश्री जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे एस. आर. पाटील, देवस्थान समितीचे अभियंता सुयश पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.महापालिकेने अंबाबाई मंदिर परिसर विकासासाठी बनविलेल्या २५५ कोटींच्या आराखड्याअंतर्गत ४५ कोटींच्या निधीला मंजूरी मिळाली आहे. त्या आराखड्यात व नव्याने बनविण्यात आलेल्या अंबाबाई मंदिर विकास प्राधीकरण अंतर्गत बनविलेल्या आराखड्यात दर्शन मंडप, पार्कींग सारखी काही कामे आली आहे. या दोन्ही आराखड्यांचे प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आले आहेत.

# आंध्र प्रदेशातील जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर

■ **सत्ताधारी आणि विरोधकांकडून जोरदार मोर्चेबांधणी**



**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत चांगलं यश मिळवण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असून भाजप आणि काँग्रेस हे दोन प्रमुख राजकीय पक्ष निवडणूक रिंगणात उतरण्याआधी नवनवे मित्रपक्ष सोबत घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत. अशातच भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएत आंध्र प्रदेशचेमाजी मुख्यमंत्रीचंद्राबाबू नायडूयांच्या तेलगू देसम पक्षाची घरवापसी झाली असूनचंद्राबाबू नायडूयांनी काही वेळापूर्वी जागावाटपाचा फॉर्म्युलाही जाहीर केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत कोण किती जागांवर लढणार, याबाबतची माहिती नायडू यांच्याकडून देण्यात आली आहे.-ऊाएठढखडएचएछढ-वी लूजागावाटपाविषयी माहिती देताना चंद्राबाबू नायडू यांनी म्हटलं आहे की, अमरावतीत आज झालेल्या बैठकीत भाजप, टीडीपी आणि जेएसपी या तीन पक्षांनी जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला. या महत्त्वपूर्ण पावलामुळे आताआंध्र प्रदेशातीललोक आपल्या राज्यावर पुन्हा हक्क मिळवण्याकडे आणि उज्वल भविष्याकडे मार्गक्रमण करणार आहे, असा विश्वास नायडू यांनी व्यक्त केला आहे. कोणता पक्ष किती जागा लढवणार?चंद्राबाबू नायडू यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंध्र प्रदेशात भाजप लोकसभेच्या ६ आणि विधानसभेच्या १० जागा लढवेल, टीडीपी लोकसभेच्या १७ आणि विधानसभेच्या १४४ तर जेएसपी लोकसभेच्या २ आणि विधानसभेच्या २१ जागा लढवणार आहे.चंद्राबाबू नायडू हे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या पहिल्या कार्यकाळात एनडीए आघाडीत होते. आता ते पुन्हा एनडीएमध्ये सामील झाल्याने भाजपला आंध्र प्रदेशात राजकीय फायदा होणार हे निश्चित आहे.

# आमदार निलेश लंके शरद पवार गटात?

**मुंबई :** अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार गटात सामिल झालेले निलेश लंके आता पुन्हा घरवापसी करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे निलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या उपस्थितीत आज शरद पवार गटात प्रवेश करत आहेत. पुण्यातील कार्यालयात हा सोहळा होत असून शरद पवारांकडून निलेश लंके यांची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनीही निलेश लंकेंना आपल्यासोबत येण्याचे आवाहन केले होते.

आगामी लोकसभा निवडणुकांची घोषणा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून शिवसेना उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने काही जागांवर उमेदवारांची घोषणाही केली आहे. जागावाटपावरुन राजकीय पक्षांच कसरत होत असून अहमदनगरच्या राजकारणात अत्यंत रंजक घडामोडी पाहायला मिळत आहेत. भाजपा नेते आणि खासदार सुजय विखे यांच्या अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ सध्या केंद्रबिंदू ठरला आहे. कारण, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांचे नाव अहमदनगर दक्षिणमधील संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहे.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर पारनेरचे आमदार निलेश लंके अजित पवार गटासोबत राहिले. मात्र, गेल्या काही दिवसांपासूनची त्यांची भूमिका पाहात ते ते कोणत्याही क्षणी शरद पवार गटात प्रवेश करतील, अशी जोरदार चर्चा आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी निलेश लंके यांना जाहीरपणे आपल्यासोबत येण्याची साद घातली होती.

# देशभरात CAA कायदा लागू, अधिसूचना प्रसिद्ध

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आज CAA संदर्भात मोठ्या निर्णयाची घोषणा केली आहे. केंद्र सरकारने गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेला CAA कायदा देशभरात लागू केला असून, त्या संदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. CAA अंतर्गत बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये होणाऱ्या छळामुळे भारतात आलेल्या गैर मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व मिळणार आहे. ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेले हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन भारताचं नागरिकत्व घेऊ शकतात.

**चार वर्षांनंतर अंमलबजावणी**

डिसेंबर २०१९ मध्ये CAA संसदत मंजूर झाला होता. या कायद्याला राष्ट्रपतींची संमतीदेखील मिळाली होती. पण, देशाच्या अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली, परिणामी अनेक मृत्यू झाले. ४ डिसेंबर २०१९ रोजी संसदेत विधेयक मांडले गेले तेव्हा आसाममध्ये पहिल्यांदा निदर्शने सुरू झाली. यानंतर ही निदर्शने दिल्लीसह मोठ्या शहरांमध्ये पसरले. निदर्शनांमुळे २७ मृत्यू झाले, त्यापैकी २२ एकट्या उत्तर प्रदेशात घडले.

एक हजाराहून अधिक लोकांना अटक करण्यात आली असून आंदोलकांवर ३०० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या सर्व विरोधामुळे हा कायदा लागू करण्यात उशीर झाला.

लोकसभा निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे त्यांनी जाहीर केले होते.अखेर आज केंद्र सरकारने या कायद्याच्या अंमलबजावणीबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली.

# देशाच्या घटनेत बदल करण्याचे भाजप नेतृत्वाचे स्वप्न

## शरद पवारांचा भाजपवर निशाणा



**बारामती :** देशाच्या घटनेत बदल करण्याचे स्वप्न भाजपचे नेतृत्व पाहत आहे आणि त्यासाठीचभाजपामत मागत आहे. घटना बददलली तर सामान्य माणसाचे अधिकार उध्दवस्त होतील, अशा शब्दात ज्येष्ठ नेतेशरद पवारयांनी भाजपवर निशाणा साधला.-ऊाएठढखडएचएछढबारामती येथे आयोजित समस्त होलार समाज विकास मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी पवार म्हणाले, अनेक देशात लोकशाही असुन देखील संविधान मजबुत नसल्याने सरकार नीट चालत नाही. मात्र,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या राज्यघटनेमुळे आपला देश एकसंघ राहीला. मात्र,सध्या ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे. त्यांना वेगळ्या दिशेने देशाचा गाडा चालवायचा आहे.भाजपाचेकर्नाटकातील खासदार अनंतकुमार हेगडे यांनी काल-परवा केलेल्या भाषणात विशेष बहुमत मिळाल्यास घटनेत बदल करू आणि यासाठी मोदींच्या पाठीशी राहणाचं आवाहन केलं. हे भयानक षडयंत्र शिजतंय. एकदा घटना बदलली, तर तुमचे आमचे सगळे अधिकार गेले. याला कडाडून विरोध केला पाहिजे. आपला शाहू-फुले-आंबेडकर विचार संकटात सापडला आहे. तुम्हा-आम्हाला वेळीच खंबीर पावले उचलावी लागतील,असे पवार म्हणाले.मी मुख्यमंत्री होतो,त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव दिलं.तेव्हा संपुर्ण महाराष्ट्रात दंगे, जाळपोळ सुरु झाली. मात्र ज्या महान व्यक्तीने संपुर्ण देशाला घटना दिली. त्यांचे नाव देणे गुन्हा वाटत असेल तर तो मी केला.त्याची आम्हाला फिकीर नाही. देशात जातीयवादी डोकं वर काढतायेत. या प्रतिगामी शक्तींचा आपल्याला पराभव करायचा आहे. बारामतीकडे संपुर्ण देशाचे लक्ष आहे. मला खात्री आहे की, बारामतीचा मतदार विचारापूर्वक निकाल घेईल,असे पवार म्हणाले.

# जागावाटपासाठी देवेंद्र फडणवीस दिल्लीत

## महाराष्ट्रातून बडे नेते निवडणुकीच्या मैदानात?



**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील महायुतीच्या जागावाटपाचा घोळ अजूनही सुरुच आहे. शिंदे आणि अजित पवार गट जागावाटपात नाराज असतानाच (११ मार्च) भाजपची दिल्लीत बैठक सुरु झाली आहे. या बैठकीत महाराष्ट्रातील जागांवर पहिल्यांदा चर्चा झाल्याचे समजते. कोल्हापूरसाठी समरजित घाटगे यांच्या नावावर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. ही जागा शिंदे गटाने न सोडल्यास धनुष्यबाण चिन्हाचाही विचार होऊ शकतो, अशी माहिती सूत्रांकडून समजते.

तसेच पुण्यातून मुरलीधर मोहोळ आणि पंकजा मुंडे यांच्या नावावरही चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामुळे प्रीतम मुंडे यांचा पत्ता कट करून पंकजा यांना संधी दिली जाणार का? अशीही चर्चा आहे. अनेक जागांवर उमेदवार बदलण्याचा सल्ला दोन दिवसापूर्वी बैठक झाली होती तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिला होता. यानुसार बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत महाराष्ट्रातील जागांवर चर्चा करण्यात आली. यानंतर केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, सुधीर मुनगंटीवार चंद्रकांत पाटील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील उपस्थित राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीही या बैठकीत सामील होतील. या बैठकीपूर्वी कोअर बैटकीत चर्चा करण्यात आली.

कोल्हापुरातून समरजीत घाटगेंना रिंगणात उतरवण्याची तयारी भाजपची आहे. एकनाथ शिंदेंकडून जागा सोडली नाही तर घाटगे शिवसेनेचे उमेदवार असू शकतात, अशी चर्चा आहे. सांगलीत संजयकाका पाटील यांनाच उमेदवारी देण्याची चिन्हे आहेत. असे झाल्यास त्याठिकाणी चंद्रहार पाटील विरुद्ध संजयकाका पाटील लढत असेल. पुण्यातून मुरलीधर मोहोळ यांच्या नावाची चर्चा आहे. मुंडे भगिनींपैकी कोण उमेदवार असणार याची चर्चा संपूर्ण राज्यभरात असून बीडमधून प्रीतम मुंडेंना ब्रेक दिला जाऊ शकतो. त्याठिकाणी पंकजा मुंडे या लोकसभेच्या नव्या उमेदवार असू शकतात.

### महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे आंतरराष्ट्रीय दर्जाची व्हावीत : धनंजय मुंडे

**मुंबई :** कृषी विद्यापीठांनी शिक्षण आणि संशोधनात भरीव कामगिरी करावी. यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. सर्व विद्यापीठे आंतरराष्ट्रीय दर्जाची होण्यासाठी विद्यापीठांच्या कुलगुरूंनी प्रयत्न करावेत, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले.

या बैठकीमध्ये राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. विवेक दामले तसेच कृषिमंत्री नियुक्त विनायक काशीद व दत्तात्रय उगले , अशासकीय सदस्य, चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू डॉ. प्रशांत कुमार पाटील, डॉ. इंद्र मनी , डॉ. शरद गडाख आणि डॉ.संजय भावे यांच्या समवेत डॉ.हरिहर कौसडीकर , डॉ. हेमंत पाटील, अंकुश नलावडे, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**पाहिजेत**

**राजदंड**

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै **राजदंड**साठी पश्चिम महाराष्ट्रात **तालुका व जिल्हा प्रतिनिधी** नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# शिरूर लोकसभा मतदारसंघात मोठा ट्विस्ट...

## मराठा क्रांती मोर्चा उतरला लोकसभा मतदारसंघाच्या मैदानात

**खेड तालुक्यातील उमेदवार**

१) अंकुश सुदाम राक्षे (बहिरवाडी)
२) मनोहर महादेव वाडेकर (चाकण)
३) अनिल भिमजी राक्षे (राक्षेवाडी)
४) शंकर रामदास राक्षे (राजगुरूनगर)
५)अशोक नारायण मांडेकर (आंबेठाण)
६) निलेश बाळासाहेब आंधळे(राजगुरूनगर)
७)सुदाम बाजीराव काराळे (वाफगाव)
८) सुदाम नाईकरे (कमान)
९)कुंडलिक बबन कोहीनकर (कोहिंकरवाडी)
१०) बाबाजी मोहन कौटकर (चाकण)
११) मारुती काळूराम चौधरी (गोळेगव)
१२)संजय तुकाराम जाधव (वांद्रा)
१३) मंगेश गुलाब सावंत (शिरोली)
१४)अंकुश भास्कर काळे (वराळे)
१५) दिलीप दत्तात्रय होले( होलेवाडी)
१६) कुशल चनद्रमुळे जाधव( चाकण)
१७) विजय जैद (जैदवाडी)
१८) सचिन बाबुराव राक्षे (बहिरवाडी)
१९) राहुल आनंदराव नाईकवाडी (चाकण)
२०)अमोल ज्ञानेश्वर नाईकरे (कमान)
२१) संदेश गणपत पाचारणे (सांडभोरवाडी)
२२)वामन बाजारे (राजगुरूनगर)
२३) चेतन मोहन शेट्टे (सातकरस्थळ)
२४) मनोज राऊत (मोहखल)
२५) अभिलाष पाचारणे (सांडभोरवाडी)
२६) किरण राधमन चोरघे ( रोंधळवाडी)
२७) शिवाजी बापूसाहेब शिंदे (आंबोली)
२८) अविनाश अंनादा टोपे (वाकी)
२९) दिलीप नामदेव ढेरंगे (गुळणी)
३०) अतिश अरुण मांजरे (चाकण)
३१) भालचंद्र शंकर पिंगळे( चाकण)
३२) भगवान निवृत्ती मेदनकर ( मेदनकरवाडी)
३३) व्यंकटेश राजाराम सोरटे ( चाकण)
३४) नरेंद्र संभाजी वाळूंज ( वाकळवाडी)
३५) शाम कोंडीबा राक्षे (राक्षेवाडी)
३६) जगन्नाथ बाळासाहेब राक्षे ( बहिरवाडी)
३७) सतीश तनपुरे (बिबी)
३८) अभिषेक विलास रणपिसे (सातकरस्थळ)
३९) विकास शंकर वाडेकर (चाकण)
४०) शुभम बाळासाहेब घाडगे (राजगुरूनगर)
४१) सुदाम बाबुराव राक्षे (राजगुरूनगर)
४२) योगेश मधुकर वाडेकर (चाकण)
४३)शार्दुल संजय वाडेकर (चाकण)
४४) महेश आप्पा शेट्टे (पाईट)
४५) वैभव दत्तात्रय राक्षे ( बहिरवाडी)
४६) प्रकाश मच्छिंद्र शिंदे (राजगुरूनगर)
४७) विकास बाळासाहेब ठाकूर (ठाकूर पिंपरी)
४८)गणेश विलास वाडेकर (चाकण)
४९) श्रीकांत रमेश वाडेकर (चाकण)
५०) योगेश मधुकर वाडेकर (चाकण)
५१)भागवत कोंडीबा शेजुळ (आळंदी)
५२) श्रीकांत जयसिंग काकडे (आळंदी)
५३) रमाकांत शिंदे (आळंदी)
५४) राकेश चव्हाण (वडगाव)
५५) जिजाभाऊ तुकाराम मेदगे (औदर)
५६) राजेंद्र टाकळकर (वाफगाव)
५७) कमलेश गुलाब पठारे (पठारवाडी)
५८) अमित भरतराव टाकळकर (राजगुरूनगर)
५९) साहेबराव नारायण जाधव (वाकी)
६०)प्रमोद भिमदास कड (कुरुळी)
६१) विजय रमेश नाईकरे (कमान)
६२) दत्तात्रय विष्णु कंद (गारगोटवाडी)
६३) गणेश हरिभाऊ भोर (आंबेगाव अवसरी खुर्द)

अजून कोणी इच्छुक उमेदवार असतील त्यांनी आपली नावे ,गावाचे नाव आणि फोन नंबर यात समाविष्ट करावा व आम्हाला पाठवावा. असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा तर्फे करण्यात आले आहे. यांना उमेदवारी अर्ज भरायचे आहेत त्यांनी ९८५०६१४२१४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## १५०० पेक्षा अधिक उमेदवार देण्याची तयारी सुरू

**राजगुरूनगर :** शिरूर लोकसभा मतदारसंघात सध्या डॉक्टर अमोल कोल्हे हे एकमेव उमेदवार असल्याचे सध्याचे चित्र होते. खा.अमोल कोल्हे हे सगळीकडे प्रचारासाठी फिरताना दिसत आहेत. महाविकास आघाडी तर्फे ते शिरूर लोकसभेचे उमेदवार असतील यात आता शंका राहिलेली नाही. महायुतीचे उमेदवार अजूनही निश्चित झालेले नाहीत. असे असताना पुणे जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांची बैठक आज पिंपरी चिंचवड शहरात पार पडली. यावेळी झालेल्या निर्णयानुसार शिरूर लोकसभा मतदारसंघात १५०० पेक्षा अधिक उमेदवार स्वइच्छेने निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सध्या लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी खुल्या प्रवर्गासाठी २५,०००/- इतकी अनामत रक्कम असून इतर मागास प्रवर्गासाठी १२,५००/- इतकी अनामत रक्कम भरावी लागणार आहे. जर १५०० पेक्षा अधिक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर अनामत रकमेच्या माध्यमातून निधी शासनाच्या तिजोरीत जमा होणार आहे. मात्र मग आता क्रांती मोर्चा ने घेतलेले या निर्णयामुळे येत्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट पाहायला मिळणार आहे.

## स्मशान शेडमध्ये केवळ डागडुगजी व रंगरंगोटी करून लाखो रुपयाचा ढपला पाडल्याची चर्चा



**कुरुंदवाड :** श्री क्षेत्र नृसिंह वाडी येथील शासकीय योजनेतून उभा करण्यात आलेल्या स्मशान शेडमध्ये केवळ डागडुगजी व रंगरंगोटी करून लाखो रुपयाचा ढपला पाडल्याची चर्चा नृसिंहवाडी गावातून ऐकावयास मिळत आहे

नृसिंहवाडी येथील स्मशानभूमीतील शेड उभे करण्याकरी़ता जन सुविधा योजनेतून १०लाख रुपये तर ग्रामपंचायत फंडातून ३ लाख रुपये असे एकूण १३ लाख रुपये खर्च करून स्मशान शेडची सुधारणा करण्यात आली आहे मात्र संबंधितांनी शेडचे पत्रे बदलून केवळ जुन्याच शेडच्या सांगाड्याला रंगरंगोटी करून लाखो रुपये गडप केले असल्याचे जनतेतून चर्चेला जात आहे

ढपला पाडल्याची चर्चा संपूर्ण गावातून सुरू असताना बांधकाम विभाग व नृसिंहवाडी ग्रामपंचायत केवळ बघ्याची भूमिका का पार पाडत आहे असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे माणसाच्या आयुष्यातील शेवटची ठिकाणी दहनक्रिया केली जाते अशा ठिकाणीही संगणमताने ढपले पडले जात असतील तर ढपला पाडणाऱ्यांची सामाजिक नैतिकता किती ढासळत चालली आहे याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे नागरिकांतून उघड उघड बोलले जात आहे

नुकतेच नृसिंहवाडी ग्रामपंचायत उपसरपंच निवडणुकीमध्ये सत्तांतर होऊन विरोधी पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली आहे ते तरी अशा ढपला प्रकाराची चौकशी करून त्याला आळा घालावा अशी रास्त अपेक्षा सामान्य जनतेतून व्यक्त होत आहे

याबाबत ग्राम विकास अधिकारी टोणे यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असता स्मशानभूमी सुधारणा शेड करता १३लाख रुपये मंजूर असून ते खर्च करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले मात्र अधिक बोलण्यास त्यांनी नकार दिला.

## जाणीव जागृती मंच, राजगुरूनगर यांच्या वतीने

# जागतिक महिला दिन साजरा



**राजगुरूनगर :** जाणीव जागृती मंच राजगुरुनगर चे वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त जागतिक महिला दिन राजगुरुनगर नगर परिषदेच्या महिला सफाई दूत ३४ यांचा सन्मान करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या, पर्यावरण रक्षक सन्माननीय रत्नाताई सुरेश पिंगळे (देशमुख) यांच्या हस्ते नगर परिषदेच्या ३४ महिला सफाई दूत यांचा सन्मानचिन्ह, श्रीफळ, पुष्प व सफाई संरक्षण स्टोल, हातमोजे साहित्य व संसार उपयोगी भोजनाचे ताट देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मंचाचे अध्यक्ष राष्ट्रपती पारितोषिक विजेते विठ्ठलराव भोर होते.

प्रमुख पाहुण्या लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या, पर्यावरण रक्षक रत्नाताई सुरेश पिंगळे (देशमुख) या होत्या, तर पुणे जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी सिद्धार्थ चव्हाण, मंचाचे अध्यक्ष विठ्ठलराव भोर, मंचाच्या संचालिका ड.. जनाबाई साकोरे यांनी महिलांसंबंधी कायदेविषयी मार्गदर्शन केले. सन्मानार्थी पूजा पवार व लक्ष्मी ससाणे (मुकादम) यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी वडगांव पाटोळे विविध कार्यक्रारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन शांताराम पाटोळे, मंचाचे उपाध्यक्ष सुनील मांजरे, सचिव मुरलीधर थिगळे, सहसचिव सतीश चांभारे, खजिनदार काळुराम सांडभोर, शालिमार हॉटेलच्या प्रमुख स्वाती सांडभोर, जिजाराम शिंदे, ड रामचंद्र घोलप, ड. महादेव घुले, किसनराव गोपाळे, लक्ष्मण वाळुंज, गोपाळ थिगळे, शांताराम भडके, हरिदास काकडे, शंकर बोरसे, सूर्यकात घोलप, रामचंद्र लोहकरे, कैलास गोसावी, प्रदीप पंचरत्न, विष्णू लोहकरे, मारूती रायकर, गजानन मायदेव, यशवंत बोंबले, शिवाजी वाळूंज, दत्तात्रय वाळूंज, वैभव कोहिनकर, ड. पांडुरंग राऊत, अशोक डोंगरे, मिलिंद कांबळे, अजय शिंगवी, डॉ. ठोंबरे इत्यादी मंचाचे सभासद, राजगुरुनगर नगर परिषदेच्या महिला सफाई दूत व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे यांचा परिचय व स्वागत सहसचिव सतीश चांभारे यांनी केले. प्रास्ताविक सचिव मुरलीधर थिगळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास मेदगे सर यांनी केले तर आभार अँड. अनिल राक्षे यांनी मानले.

## यशवंत सहकारी साखर कारखान्यांच्या आण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीने

# १८ जागा जिंकून बाजी मारली



**लोणी काळभोर :** थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीने २१ पैकी १८ जागा जिंकून बाजी मारली असुन आण्णासाहेब मगर रयत सहकार पॅनलला केवळ तीन जागेवर समाधान मानावे लागले.

हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रताप गायकवाड, माजी सभापती व विद्यमान संचालक प्रकाश जगताप, बाजार समितीचे विद्यमान संचालक प्रशांत काळभोर, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब चौधरी यांच्या नेतृत्वात आण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडी निवडणूक लढविली होती,तर हवेलीचे जेष्ठ नेते माधव काळभोर, हवेली बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, बाजार समितीचे विद्यमान संचालक रोहिदास उंद्रे व महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर यांच्या प्रमुख नेतृत्वाखालील अण्णासाहेब मगर रयत सहकार पॅनल निवडणूक यंत्रणा राबविली होती.

थेऊर (ता. हवेली) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची मतमोजणी उरुळी कांचन (ता. हवेली) येथील महात्मा गांधी विद्यालयात रविवारी (ता. १०) सकाळी सुरु झाली. हि मतमोजणी मध्यरात्री पर्यंत सुरु होती. त्यामुळे काही निकाल मध्यरात्री १ ते दीड वाजण्याच्या सुमारास लागले. या निवडणुकीत अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीने २१ पैकी १८ जागा जिंकून एकहाती सत्ता मिळविली आहे. तर या निवडणुकीत रयत सहकार पॅनलला केवळ ३ जागा मिळाल्याने मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला.

अण्णासाहेब मगर रयत सहकार पॅनल व अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडी या दोन्ही पॅनल प्रमुख आपणच विजयी होणार असा दावा करीत होते. मात्र या निवडणुकीच्या निकालावरून शेतकरी सभासदांनी आपला कौल अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीला दिल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तर या निवडणुकीच्या निर्णय अधिकारी म्हणून डॉ. शीतल पाटील यांनी काम पहिले.

# भाजपाने ओबीसी समाजाला न्याय देण्याचे काम केले : शंकर जगताप

## पिंपळे गुरव येथे ओबीसी सामाजिक संमेलन उत्साहात; ओबीसी मोर्चा पदनियुक्ती पत्रांचे वाटप



**पिंपरी :** ओबीसी बांधवांसाठी केंद्र व राज्य शासनाने मोठा निधी दिला आहे. विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून बारा बलुतेदार बहुजन समाजाला पुढे आणण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. ओबीसी, पिंपरी चिंचवड, भारतीय जनता पार्टी आणि स्व. लक्ष्मणभाऊ यांचे एक अतूट नाते आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप पक्षाने जातीची तेढ न बांधता ओबीसी समाजाला न्याय दिला आहे. नावे घेण्यासारखे असे अनेक नेते, कार्यकर्ते यांना ओबीसीमधून लाभाची पदे दिली. भाजपामध्ये खाली बसणा-यांमधून आमदार होतो, कार्यकर्ता आमदार होतो, नवीन निवडून आलेले आमदार हे मुख्यमंत्री झालेले आहेत. प्रथम राष्ट्र, मग पक्ष, नंतर स्वत: या घोषवाक्याप्रमाणे प्रत्येकाने संघटनात्मक कार्य करून मोदी सरकारच्या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने रविवारी ओबीसी सामाजिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप बोलत होते. पिंपळे गुरव येथे मोठ्या उत्साहात हे संमेलन पार पडले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, आमदार उमाताई खापरे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वीणा सोनवलकर, भटके-विमुक्त प्रदेश सरचिटणीस प्रमोद परदेशी, माजी महापौर माई ढोरे, अपर्णाताई डोके, स्थायी समिती माजी सभापती व ओबीसी मार्चा शहराध्यक्ष राजेंद्र राजापुरे, भाजपा शहर सरचिटणीस नामदेव ढाके, प्रवक्ते तथा उपाध्यक्ष राजू दुर्गे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, भाजपाचे प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, ओबीसी मोर्चाचे सहसंपर्क प्रमुख मनोज ब्राह्मणकर, सरचिटणीस विनोद दळवी, गोरक्ष काळे, प्रदेश सदस्य गणेश वाळुंजकर, पुणे ग्रामीण उत्तर अध्यक्ष दत्तात्रय माळी, भाजपा ओबीसी मोर्चा सरचिटणीस दत्ता ढगे, खंडूदेव कठारे, अनिल राऊत, महिला ओबीसी संपर्कप्रमुख रोहिणी रासकर, भटके-विमुक्त आघाडी शहराध्यक्ष गणेश ढाकणे, सरचिटणीस सूर्यकांत गोफणे, सोनाताई गडदे, योगेश आकुलवर यासह संमेलनाला शहरातील ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्यने उपस्थित होते. प्रसंगी, ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना पद नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले.

शंकर जगताप म्हणाले की, मावळ लोकसभा मतदार संघ भारतीय जनता पक्षाने लढावे, ही सर्व सामान्य कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यासाठी आपल्याला बूथ स्तरावर ५१ टक्के मतदानासाठी मैदानात उतरावे लागणार आहे. अस असेल तरच केंद्र आणि प्रदेश स्तरावर मावळासाठी आपला कमळाचा विचार होणार आहे. त्यासाठी आपण सर्वांनी ५१ टक्यांची लढाई लढायची आहे. या कार्यासाठी पक्षासाठी आपण उभे राहिले तर पक्ष आपल्या पाठीशी उभा आहे.

भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी या संमेलनात देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गेल्या दहा वर्षात ओबीसी समाजासाठी केलेल्या कार्याचा आढावा मांडला. ओबीसी समाजासाठी सुरू केलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती त्यांनी दिली. तसेच ओबीसी मार्चाच्या पदाधिकाऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष राजेंद्र राजापुरे यांच्या संयोजनात कार्यक्रम पार पडला.

# लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांची स्वप्नपुर्ती



पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भू संपादित केलेल्याजमिनीच्या मूळ मालकांना १२.५% परतावा मिळणेबाबत लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर न्याय मिळाला !

विधिमंडळात प्रश्न लक्षवेधी मांडून मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांना सात्यत्याने केलेला पत्रव्यवहार व पाठपुराव्याला आज दिनांक ११.०३.२०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देऊन न्याय दिल्याबद्दल आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मा. मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मा.अजितदादा पवार यांचे आभार मानले !!!

पिंपरी चिंचवड शहरात १९७२ साली पिंपरी-चिंचवड नवनगर विकासप्राधिकरणची (झउछ्ड्ढ-) स्थापना झाल्यांनतर शहरातील निगडी, आकुर्डी, वाल्हेकरवाडी या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनीप्राधिकरणाने भूसंपादित केल्या व मूळ मालकांना भूमिहीन, बेकारबनवून गुंठ्याने जमिनी विक्री केल्या. जमीन धारक भूमिहीन न होण्यासाठी शासनाने १२.५टक्के क्षेत्र परताव्याचे धोरण अंगिकारले असून सन १९८४ व १९९३ नंतरच्या भूसंपादन बाधितांसाठी१२.५ टक्के क्षेत्र परताव्याचे सुधारित आदेश काढून त्याची अंमलबजावणी अद्याप होत आहे.

परंतु १९७२ ते १९८४ मधील जमीन धारकांसाठीही उपरोक्त परतावा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. उद्योगनगरीतील शेतकऱ्यांच्या सन १९७२ साली जमीन ताब्यातघेऊन औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना स्वस्त दरात घरकुल उपलब्ध करून देण्याच्याउद्देशाने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (झउछ्ड्ढ-) स्थापन करण्यात आलेपरंतु मागील पन्नास वर्षांपासून एकीकडे जमीन ताब्यात घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या १२.५ टक्केप्रमाणे मोबदला नाही मिळाला, आणि अधिकृत बांधकामांचेनियमितीकरण , वाढीव बांधकामाचे नियमितीकरण, भूखंड लीज होल्ड फ्री करणे इत्यादी प्रश्न प्रलंबित असताना दुसरीकडेपीएमआरडीएच्या आवाक्याबाहेर झालेल्या भौगोलिक विस्तारात पिंपरी-चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण (झउछ्ड्ढ-) चे विलिनीकरण पुणे महानगर विकासप्राधिकरण(झचठऊ-) मध्ये केल्याने प्राधिकरणच्या विकासालाचालना मिळणेऐवजी बकाल स्वरूप येण्याची शक्यता असल्याने प्राधिकरणाकडे उपलब्धअसलेल्या जमिनीपैकी ज्याअर्थी सिडकोने १९७२ पासूनचे बाधित मिळकत धारकांना १२.५ टक्केदराने परतावा दिला आहे, त्याचप्रमाणे प्राधिकरणाने देखिल १९७२ पासूनच्या सर्व बाधित जमीन मालकांना १२.५ टक्के जमीन परतावा देणे महत्त्वाचे ठरेल. संबंधित १२.५ टक्केपरतावा देणेबाबतचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी केलेल्या मागणीला अखेर न्याय मिळाला..

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# कोरेगावात साकारत असलेले लोकशाहीचे मंदिर अवघ्या सात महिन्यात उभारणार : ना. महेश शिंदे

## पंचायत समितीच्या नूतन आदर्शवत इमारतीचे भूमिपूजन



**कोरेगाव :** स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी पंचायत राज व्यवस्था महाराष्ट्रात आणली, त्यांनी दूरदृष्टीने ग्रामीण भागातील कार्यकर्त्याला समाजाची सेवा करण्याची संधी दिली. ग्रामविकासामध्ये मैलाचा दगड ठरलेल्या पंचायत समितीची इमारत म्हणजे लोकशाहीचे मंदिर आहे. कोरेगावात नव्याने उभारले जात असलेले लोकशाहीचे मंदिर अवघ्या सात महिन्यांमध्ये पूर्ण केले जाईल. संपूर्ण महाराष्ट्रातील आदर्शवत इमारतीच्या माध्यमातून कोरेगाव तालुक्याचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी व्यक्त केला.

कोरेगाव शहरात सातारा लातूर राष्ट्रीय महामार्गावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एक च्या जागेवर २३ कोटी ५० लाख रुपये निधीतून नव्याने उभारण्यात येत असलेल्या आणि पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन रविवारी दुपारी एक वाजता ना. महेश शिंदे यांच्यासह भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख मनोजदादा घोरपडे,सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील खत्री, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य राहूल प्रकाश बर्गे, भाजपचे कोरेगाव मंडलचे अध्यक्ष संतोषआबा जाधव, दत्तूभाऊ धुमाळ, संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजना समितीचे अध्यक्ष विजयराव घोरपडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पोपट करपे, राहूल कदम, डॉ.अभय तावरे, किरण बर्गे, भिमरावकाका पाटील, कोरेगाव विकास आघाडीचे अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, नगराध्यक्ष दिपाली बर्गे, उपनगराध्यक्ष सुनीलदादा बर्गे यांच्यासह मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी सर्वसामान्य शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधताना ना. शिंदे बोलत होते. व्यासपीठावर सातारा जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, जल जीवन मिशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी क्रांती बोराटे, जिल्हा परिषद बांधकाम विभाग उत्तरचे कार्यकारी अभियंता मोहसीन मोदी, तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, पंचायत समितीच्या प्रशासक तथा गट विकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, उपअभियंता रेहाना मुल्ला, उत्तमराव आंधळे यांच्यासह सर्व प्रशासकीय खाते प्रमुख उपस्थित होते.

### ग्रामीण भागाचा समतोल विकास

**कोरेगाव शहरामध्ये आज नवनवीन शासकीय आणि नगरपंचायतीच्या इमारती उभारण्यात येत आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात देखील सर्वांगीण विकास करत असताना सर्वसामान्य जनतेला अपेक्षित असलेली विकासकामे प्राधान्य क्रमाने मार्गी लावली आहेत. ग्रामीण भागात समतोल विकास साधत असताना प्रत्येक गावात मजबूत रस्ते, गटर्स व्यवस्था, सामाजिक सभागृह, ग्रामपंचायत इमारत, पाणी योजना आदी जनतेशी निगडीत कामे मार्गी लावली असल्याचे ना. महेश शिंदे यांनी सांगितले. पंचायत समितीची इमारत ही ग्रामीण भागाच्या विकासाचे प्रतीक ठरणार असून प्रशासकीय पातळीवर दोन वर्षाची मुदत असली तरी अवघ्या सात महिन्याचे काम पूर्ण केले जाणार असल्याचे ना. महेश शिंदे यांनी सांगितले.**

ना. महेश शिंदे पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिप्रेत असलेला भारत घडविण्यासाठी सर्वसामान्य जनतेने पुढाकार घेतला आहे. याच जनतेने ताकद देऊन विधानसभेत काम करण्याची संधी दिली. या संधीचे सोने केले असून कोरेगाव विधानसभा मतदारसंघात हजारो कोटी रुपयांची विकास कामे मार्गी लागली आहेत. काही कामे प्रगतीपथावर आहेत तर काही कामे पूर्ण झाली आहेत. पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधला जातो. १३ विविध विभागांमार्फत कामकाज चालते. सर्व विभाग एका इमारतीत आणि एका छताखाली आणून संपूर्ण राज्यातील आदर्शवत इमारत उभारण्याचे भाग्य मला लाभले आहे. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. रवींद्र चव्हाण व ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांनी केलेल्या सहकार्यामुळे आणि जिल्हा प्रशासनाने दिलेल्या केलेल्या पाठपुराव्यामुळे आज ही इमारत साकारत आहे. या इमारतीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हिताची कामे होतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या माध्यमातून कोरेगाव तालुक्यासाठी १२५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. पिंपोडे खुर्द फाटा ते कोरेगाव, कोरेगाव ते चिलेवाडी आणि कोरेगाव ते रहिमतपूर असे प्रशस्त रस्ते ट्रीमिक्स कॉंक्रिटीकरण आणि चौपदरीकरण होणार आहेत. लवकरच ही कामे सुरू होतील, असे स्पष्ट करून ना. महेश शिंदे यांनी कोरेगाव तालुक्याला हक्काचे अडीच टीएमसी पाणी उपलब्ध करून दिले आहे. केवळ कोरेगाव मतदारसंघात नव्हे तर कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील गावांना देखील पाणी उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध पाणी अरबवाडी धरणामध्ये टाकण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगतात उपस्थित त्यांनी टाळ्या वाजवत स्वागत केले.

धैर्यशील कदम, मनोजदादा घोरपडे व सुनील खत्री यांनी आपल्या भाषणामधून ना. महेश शिंदे यांनी कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा केलेल्या आदर्श विकासाबद्दल अभिनंदन केले. जागरूक लोकप्रतिनिधी असेल तर काय करू शकतो, काय घडवू शकतो हे कोरेगावात आल्यावर समक्ष दिसते. कोरेगाव विधानसभा मतदारसंघाने विकासाभिमुख प्रगती साधली आहे.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. भूमिपूजन कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तदनंतर व्यासपीठावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रशासक तथा गट विकास अधिकारी सुप्रिया चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव घुले यांनी आदर्शवत इमारतीची माहिती दिली. राहूल प्रकाश बर्गे यांनी आभार मानले. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनदादा वीर, संजय साळुंखे, सदस्य नवनाथ केंजळे, जयवंत पवार, रविंद्र बोतालजी, विलास पवार, विकास राऊत आदींसह मान्यवर पंचायत समितीच्या माजी पदाधिकारी व सदस्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास आजी-माजी नगरसेवक, विविध गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, विकास सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, पंचायत समितीच्या अधिनस्त असलेल्या विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिरढोणमध्ये अस्थिविसर्जनावरून मारहाण

**कोरेगाव :** मौजे शिरढोण ता. कोरेगाव खडकी नावाच्या शिवारात अस्थी विसर्जन व त्यावरील देव वेगळ्या ठिकाणी बसवण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात शिवीगाळ दमदाटी करून हातातील लाकडी दांडक्याने व दगडाने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी. याप्रकरणी राजेश मोहन गुजर यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

मोजे शिरढोण तालुका कोरेगाव येथे खडकी नावाच्या शेत आजोबांच्या अस्थी विसर्जन करीत असताना त्यावरील देव वेगळ्या ठिकाणी बसवण्याच्या कार्यक्रमांमध्ये एकूण नऊ जणांनी आपसात संगणमत करून हे जागृत देवस्थान आहे देव तुम्हाला बघून घेईल असे म्हणाला असता त्याच तुम्हाला जर असे बोलायचे होते तर तुम्ही आम्हाला या कार्यक्रमाला कशाला बोलावले असे म्हणाल्याच्या कारणावरून शिवीगाळ,दमदाटी करून हातातील लाकडी दांडक्याने व दगडाने मारहाण केल्याने फिर्यादी व फिर्यादीची आई दोघेजण जखमी झाले.

याप्रकरणी राजेश मोहन गुजर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोरेगाव पोलिसांनी भैरू गुजर, अर्जुन गुजर,आदित्य गुजर, दिपाली गुजर,सावित्रा गुजर, विकास गुजर,विठ्ठल गुजर राहणार सर्व शिरढोण तसेच नीलम गुजर, संतोष गुजर दोन्ही राहणार सरस्वती हायस्कूल पाठीमागे कोरेगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सचिन साळुंखे करीत आहेत.




**एरिया सेल्स मॅनेजर, वैभव कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना बी. डी. साळोखे व उपस्थित मान्यवर**

## ग्राहकाभिमुख कामानेच प्लंबिंग क्षेत्राचा विकास : वैभव कुलकर्णी

### पन्हाळ्यात जागतिक प्लंबिंग दिनानिमित्त कार्यशाळा

**पन्हाळा :** आधुनिक तंत्रज्ञानानेच प्लंबिंग साहित्य कुशलतेने वापरतांनाच ग्राहकांच्या गरजा व त्यांचे समाधान या दोन बाबींची पूर्तता केल्यानेच प्लंबिंग क्षेत्राचा विकास होणार आहे. तसेच प्लंबिंग टेक्निशियन व ग्राहक यांच्यात सुसंवाद निर्माण होऊन प्लंबिंग व्यवसायास अधिक प्रतिष्ठा लाभेल असे मत फिनोलेक्स पाईप कंपनीचे एरिया सेल्स मॅनेजर, मा.वैभव कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते शासकीय आयटीआय पन्हाळा व फिनोलेक्स पाईप कंपनी यांचे संयुक्त विद्यमाने प्लंबिंग दिनानिमित्त आयटीआय, पन्हाळा येथे आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते.

फिनोलेक्स पाईप कंपनीचे विक्री अधिकारी आकाश खैरे यांचे या कार्यशाळेत मार्गदर्शन लाभले.त्यावेळी त्यांनी उपस्थितांना स्लाईड शोव्दारे मार्गदर्शन केले. यावेळी दाखवण्यात आलेल्या स्लाईड शोमधून जागतिक दर्जाचे आधुनिक प्लंबिंग साहित्याचे तंत्रज्ञान, देखभाल आधिसंबंधी माहिती दिली. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्लंबर निदेशक नईम नदाफ यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस संस्थेतील बी. डी. साळोखे, एन. व्ही. मिरजकर, एस. आर. कांबळे, श्रीमती एस. व्ही. सासने, श्रीमती एन. एम. नवले, एच. टी. परीट व एस. पी. लांडगे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे सुत्रसंचालन बी.आर.घोरपडे, गटनिदेशक आयटीआय, कोल्हापूर यांनी केले व बी. डी. साळोखे यांनी आभार मानले.

## क्राईम

### ट्रॅक्टर ट्रॉलीची दुचाकीला धडक

सातारा : लिंब, ता. सातारा येथील राष्ट्रीय महामार्गावर चुकीच्या पध्दतीने ट्रॅक्टर चालवल्यामुळे ट्रॉलीची धडक दुचाकीला बसली. त्यात दोघे युवक जखमी झाले. ही घटना दि. ९ रोजी सकाळी ९.३० वाजता घडली.

सातारा तालुका पोलीस ठाण्यात अशोक दत्तात्रेय दाभाडे (वय ५७, रा. बावधन, ता. वाई) यांनी फिर्याद दिली असून, उमेश हणमंत माळी (वय २९, रा. जांब, ता. वाई) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीत नमूद केले आहे की, बावधनहून साताऱ्याकडे निघाले असताना लिंब येथे उमेश माळी हा ट्रॅक्टर (एमएच ११ यू ५६७६) हा लोकांना अडथळा होईल, त्यांच्या जिवितास धोका होईल, असा चालवत होता. त्यामुळे दुचाकीला (एमएच ११ बीजी ७३९८) पाठीमागील ट्रॉलीची धडक बसली. त्यात दुचाकीस्वार ऋषिकेश मारुती दाभाडे (वय २०), सारंग संतोष कुंभार (वय १८, रा. बावधन) हे दोघे जखमी झाले. पोलीस हवालदार वायदंडे तपास करत आहेत.

### आंबेवाडी येथे ऊस चोरुन नेला

सातारा : आंबेवाडी, ता. सातारा येथे फिर्यादी महिला व ऊसतोड कामगारांना धकमावून, जबरदस्तीने ऊस चोरुन नेल्याची घटना घडली. हा प्रकार दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी झाला आहे. याबाबत बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, याबाबत फिर्यादीने खटला दाखल केल्यानंतर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वनिता मनोहर यादव (वय ५७, रा. आंबेवाडी, पो. माजगाव, ता. सातारा, सध्या रा. मुंबई) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार बबन राजाराम पवार (वय ७२), महादेव राजाराम पवार (वय ७०), सौ. नंदा महादेव पवार (वय ६०), सुशांत मनोहर पवार (वय ३२), धोंडीराम राजाराम पवार (वय ६५), भरत महादेव पवार (वय २६), दत्तात्रेय बबन पवार (वय ३५), सुरज बाजीराव शितोळे (वय २९, सर्व रा. आंबेवाडी) यांच्या विरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वनिता यादव यांच्या आंबेगाव येथील मालकीच्या क्षेत्रातील ऊस अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याला घातला जात होता. कामगारांमार्फत तोडून तो कारखान्यात नेला जात असताना यातील सात संशयित आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यादव, ऊसतोड कामगारांना धमकावले. तसेच जबरदस्तीने ऊस ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरुन नेवून चोरुन नेला. पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पाटील तपास करत आहेत.

### साताऱ्यात जुगारावर कारवाई

सातारा : येथील आरटीओ ऑफिस ते सिव्हिल हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर कुबेर विनायक गणपतीच्या मंदिराच्या पाठिमागे असलेल्या पानटपरीच्या आडोशाला जुगाराचा खेळ सुरु होता. यावर पोलीस कॉन्स्टेबल कदम यांनी दि. ९ रोजी रात्री ८.५३ वाजता कारवाई केली. सचिन निवृत्ती कदम (वय ३९, रा. मोळाचा ओढा, सातारा), शाहरुख काझी (रा. कोरेगाव) यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### चंदननगर येथून युवती बेपत्ता

सातारा : चंदननगर (कोडोली, ता. सातारा) येथील राहत्या घरातून राधा सुनील मचारे (वय ३०) ही शिवण क्लासला जाते असे सांगून दि. ९ रोजी रात्री ७.३८ वाजता निघून गेली आहे. ती अद्यापपर्यंत परत आली नाही. याबाबत सुनील शिवलाल मचारे (वय ३५, रा. चंदननगर) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस नाईक सूर्यवंशी तपास करत आहेत.

## कोरेगावात हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी अवैध जनावरांची वाहतूक रोखली

कोरेगाव : महाशिवरात्रीला रात्री सातारा बाजूकडून कोरेगाव जळगाव रोडच्या दिशेने तब्बल १७ जर्सी गाईंची वासरं व ५ म्हशीची रेडकं असं एकूण २२ गोवंश कत्तल करण्यासाठी घेऊन जाणारी महिंद्रा कंपनीची पिकअप गाडी कोरेगावातील जागरूक हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी अडवून कोरेगाव पोलिसांच्या ताब्यात दिली. कोरेगाव पोलिसांना संबंधित अकबर हजीम महम्मद हुसेन कुरेशी याच्यासह अन्य एका अनोळखी इसमा विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी महालिंग प्रभाकर जंगम यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

महाशिवरात्री दिवशीच महादेवाचा नंदी कत्तल खाण्यात घेऊन जाण्याचा बेत कोरेगावातील गोभक्तांना कळताच, सतर्क झालेल्या कार्यकर्त्यांनी तात्काळ ही बाब कोरेगाव पोलिसांना कळविली. कोरेगाव पोलिसांनी तात्काळ कोरेगाव हद्दीत आझाद चौक येथे डांबरी रस्त्यावर महेंद्रा पिकअप जितो गाडी क्रमांक एम.एच. ११ सी.एच. ६७०९ अडवली. त्यामध्ये एकूण १ लाख ७२ हजार किमतीची १७ जर्सी गाईची वासरे व पाच म्हशीची रेडक दाटीवाटीने क्रूरतेने तसेच त्यांचे चाऱ्या पाण्याची सोय न करता विनापरवाना वाहतूक करीत असताना मिळून आली. तसेच सदर जनावरांच्या खरेदीच्या पावत्या त्यांच्याजवळ मिळून आल्या नाहीत.

या प्रकरणी कोरेगाव पोलिसांनी संशयित आरोपी अकबर हजीम महम्मद हुसेन कुरेशी वय ४८ राहणार जळगाव रोड कोरेगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार अमोल धनवडे करीत आहेत.

## सामाजिक उपक्रमात बुलडाना अर्बन देशात अव्वल : शिरीष देशपांडे

**कोरेगाव** : देशात २० हजार कोटींचा व्यवसाय, ४७६ शाखातून ग्राहकांना सेवा तसेच १२ हजार कोटींच्या ठेवी तसेच जवळपास १७ लाख ग्राहक हित जोपासणाऱ्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या असलेल्या बुलडाना अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटीने देशात सहकार क्षेत्राला देखील लाजवेल असे मोठे काम या क्षेत्रात केल्याचा विश्वास बुलडाना अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी सातारा येथे व्यक्त केला



महिला दिनानिमित्त सातारा महिला शाखेच्या ६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शाखेचे नुतन वास्तूत स्थानांतरण सोहळा ज्येष्ठ महिला सभासद विजया सुधाकर शेटे यांच्या शुभ हस्ते तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे ज्येष्ठ महिला सभासद वनिता कारंडे, सभासद गितांजली उतेकर, बुलडाणा अर्बन, पुणे विभागाच्या विभागीय व्यवस्थापिका योगिनी पोकळे, सांगली विभागीय व्यवस्थापिका सौ. शिल्पा कुलकर्णी. यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी पुणे कमर्शियल बँकेचे उपाध्यक्ष विजय चव्हाण, संचालक तानाजी शिंदे, संचालक अनिल बाबा शिंदे तसेच मालोजीराजे सहकारी बँक फलटणचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राजेश लढढा, कोल्हापूर विभागीय व्यवस्थापक गुरुनाथ लोखंडे, सातारा विभागीय व्यवस्थापक मनोहर देशमुख ड. किशोर लुल्ला, टी. बी. लुल्ला फाऊंडेशन सांगली सातारा आभ्यासिकेच्या व्यवस्थापिका सौ. सारिका देशमुख व सातारा महिला शाखा व्यवस्थापिका सौ. विध्या कुलकर्णी तसेच बुलडाणा अर्बन सातारा विभागाचे सर्व शाखा व्यवस्थापक व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

यावेळी शिरीष देशपांडे म्हणाले सातारा ही छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी अशा ऐतिहासिक भूमीत ६ वर्षापूर्वी बुलढाणा अर्बनने महिला शाखा सुरू केली. यावेळी या शहरात या शाखेला प्रतिसाद मिळेल का अशी शंका होती मात्र येथील महिला कर्मचाऱ्यांनी ग्राहक हित जोपासत ही शाखा चांगल्या प्रकारे चालवली या शाखेला जागेचा अपुरेपणा असल्याने ही शाखा मोठ्या जागेत सुरू व्हावी यासाठी प्रयत्न सुरू होते याच सार्थक या शाखेच्या शाखा व्यवस्थापक विद्या कुलकर्णी व सातारा विभागीय व्यवस्थापक मनोहर देशमुख यांनी करून ही शाखा आता मोठ्या जागेत लॉकर सुविधेसह सुरू झाल्याने याचा लाभ महिला ग्राहकांना होईल असा विश्वास व्यक्त केला.

३८ वर्षापूर्वी राधेश्याम चांडक (भाईजी) यांनी ही संस्था सुरू केली यावेळी अवघ्या १२ हजार रुपयांवर या संस्थेचे कामकाज सुरू झाले ते आज १२ हजार कोटी ठेवीवर पोहचले याचा सार्थ अभिमान आहे. महिला दिनी सुरू झालेल्या या शाखेतून जिल्ह्यातील महिलांच्या सबलकरणासाठी ही शाखा निश्चितपने काम करेल असे मनोगत शिरीष देशपांडे यांनी यावेळी व्यक्त केले.

## बिजवडी जि. प. केंद्रशाळेचा बालआनंद मेळावा उत्साहात संपन्न..!

**दहीवडी :** प्राथमिक शाळेतील बालचमू हे चिखलाच्या गोळ्यासारखी असतात.त्यांना आकार देत त्यांच्यावर संस्कार करण्याचे कार्य शिक्षकवर्ग करतो.बालआनंद मेळाव्यासारखे विविध उपक्रम , स्पर्धा राबवत त्यांच्या कलागुणांना वाव देत देशाचे भवितव्य घडवण्याचे कार्य प्राथमिक शिक्षक करत असल्याचे प्रतिपादन जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक चंद्रकांत जगदाळे यांनी केले.



पांगरी, ता. माण येथील बिरदेव सांस्कृतिक सभागृहात संपन्न झालेल्या बिजवडी ता. माण जि. प. केंद्राच्या बाल आनंद मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी रमेश गंबरे, केंद्रप्रमुख अशोक गंबरे, सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे संचालक महेंद्र अवघडे, शहाजी दडस, कराड पाटणचे संचालक महादेव दडस, धनाजी लोखंडे, संजय जाधव, अशोक यलमर, सतीश गावडे, पुंडलीक खराडे, नलिनी सोनवलकर, स्वाती साळवे, शोभा शिंदे, अंजना शेंडे, कल्पना पाटोळे, रुपाली पवार, सतीश ढोक, प्रकाश शिंदे, कमल बोराटे आदी शिक्षक, पालक, ग्रामस्थ,विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

राजवडी शाळेच्या अत्यंत उत्कृष्ट पद्धतीच्या लेझिम पथकाने उपस्थितांचे स्वागत केले. अनभुलेवाडी शाळेने सुश्राव्य असे स्वागतपद्य व इशस्तवन सादर केले. यावेळी चमचा लिंबू, संगीतखुर्ची हे आनंददायी मनोरंजक खेळाने कार्यक्रमात रंगत आणली.

दुपारच्या सत्रात केंद्रातील सहभागी १३ शाळांनी एकाहून एक सरस कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

बालआनंद मेळव्याचे प्रास्ताविक केंद्र संचालक धनाजी लोखंडे यांनी केले.सूत्रसंचालन महेंद्र अवघडे यांनी केले तर आभार पुंडलिक खराडे यांनी मानले.

### राज्यातील सर्वात कमी तापमान पुण्यात तर सोलापूर तापले

**पुणे :** कोकण गोव्यासह संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली, तर राज्याच्या उर्वरित भागात कमाल तापमान सरासरीच्या जवळपास नोंदवले गेले. राज्यातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद पुण्यात १५.३ अंश सेल्सिअस झाली आहे. कमाल तापमान सोलापूर येथे ३९.६ नोंदवले गेले. येत्या दिवसांमध्ये तापमानाचा पारा आणखी वर जाईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

विदर्भ व मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमान सरासरीच्या तुलनेत किंचित वाढले आहे. राज्यामध्ये जवळपास सर्वत्र हवामान कोरडे राहणार असून, तापमानाचा पारा चढता राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमधील कमाल तापमान वाढू लागले आहे. काही दिवसांमध्ये हा पारा चाळीशी पार करण्याची शक्यता आहे.

## कोरेगावात हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी अवैध जनावरांची वाहतूक रोखली

**कोरेगाव :** महाशिवरात्रीला रात्री सातारा बाजूकडून कोरेगाव जळगाव रोडच्या दिशेने तब्बल १७ जर्सी गाईंची वासरं व ५ म्हशीची रेडकं असं एकूण २२ गोवंश कत्तल करण्यासाठी घेऊन जाणारी महिंद्रा कंपनीची पिकअप गाडी कोरेगावातील जागरूक हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी अडवून कोरेगाव पोलिसांच्या ताब्यात दिली. कोरेगाव पोलिसांना संबंधित अकबर हजीम महम्मद हुसेन कुरेशी याच्यासह अन्य एका अनोळखी इसमा विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी महालिंग प्रभाकर जंगम यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

महाशिवरात्री दिवशीच महादेवाचा नंदी कत्तल खाण्यात घेऊन जाण्याचा बेत कोरेगावातील गोभक्तांना कळताच, सतर्क झालेल्या कार्यकर्त्यांनी तात्काळ ही बाब कोरेगाव पोलिसांना कळविली. कोरेगाव पोलिसांनी तात्काळ कोरेगाव हद्दीत आझाद चौक येथे डांबरी रस्त्यावर महेंद्रा पिकअप जितो गाडी क्रमांक एम.एच. ११ सी.एच. ६७०९ अडवली. त्यामध्ये एकूण १ लाख ७२ हजार किमतीची १७ जर्सी गाईची वासरे व पाच म्हशीची रेडक दाटीवाटीने क्रूरतेने तसेच त्यांचे चाऱ्या पाण्याची सोय न करता विनापरवाना वाहतूक करीत असताना मिळून आली. तसेच सदर जनावरांच्या खरेदीच्या पावत्या त्यांच्याजवळ मिळून आल्या नाहीत.

या प्रकरणी कोरेगाव पोलिसांनी संशयित आरोपी अकबर हजीम महम्मद हुसेन कुरेशी वय ४८ राहणार जळगाव रोड कोरेगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार अमोल धनवडे करीत आहेत.

# महिलादिनानिमित्त कॉसमॉस आदिषक्ती पुरस्काराचे वितरण



डावीकडून बँकेचे ज्येश्ठ संचालक अॅड. प्रल्हाद कोकरे, व्यवस्थापकीय संचालिका सौ. अपेक्षिता ठिपसे, मा. सौ. मेधा कुलकर्णी, अध्यक्ष सीए मिलिंद काळे, उपाध्यक्ष श्री. प्रवीणकुमार गांधी.

**पुणे** : नुकत्याच ८ मार्च रोजी साजऱ्या झालेल्या जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने 'कॉसमॉस आदिषक्ती' पुरस्काराचे वितरण बँकेचे मुख्य कार्यालय कॉसमॉस टॉवर येथे समारंभपूर्वक करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचा सन्मान आदिषक्ती पुरस्कार देऊन करण्यात आला. यामध्ये खासदार मेधा कुलकर्णी, नीलकांती पाटेकर, नीलम एदलाबादकर, डॉ. विदुला सोहोनी, दीपा पातुरकर आणि हेमा यादव यांचा समावेष होता. बँकेच्या विविध राज्यातील षाखांमध्ये अषा प्रकारचा समारंभ आयोजित करण्यात आला होता व त्यामध्ये विषेश कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान षाखा स्तरावर करण्यात आला.

मा. खासदार सौ. मेधा कुलकर्णी यावेळी बोलताना म्हणाल्या की, ''स्त्रियांना घर आणि करिअर करताना पुरूशांनी साथ देणं, सहकार्य करणं फार महत्वाचं आहे. त्यादृश्टीने स्त्री.पुरूश समानता सर्वत्र असणे आवष्यक आहे. 'कॉसमॉस आदिषक्ती पुरस्कार' हा मला आनंद देणारा पुरस्कार असून कॉसमॉस बँकेचा हा अतिषय स्तुत्य उपक्रम आहे. कॉसमॉस बँक विष्वास आणि आपुलकीची सेवा देत असताना लोकांच्या आर्थिक सुरक्षिततेची काळजी घेत आहे.'' यावेळी विविध पुरस्कार प्राप्त महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले.

बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे याप्रसंगी बोलताना म्हणाले की, ''सर्वच क्षेत्रात आज महिला आघाडीवर आहेत. धैर्य, चिकाटी, निश्ठा आणि परिश्रम या गुणांच्या जोरावर महिला आज विविध क्षेत्रात यषस्वी होत आहेत. आमच्याही बँकेच्या प्रगतीत महिला अधिकारी वर्गाचा खूप मोठा वाटा आहे.''

महिला कर्मचाऱ्यांसाठी 'हिरकणी पुरस्कार' हा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कॉसमॉस 'हिरकणी पुरस्कार' बँकेत नोकरी करणाऱ्या महिला वर्गास प्रदान करण्यात आला.

तसेच कॉसमॉस बँकेबरोबर बँकींग करणाऱ्या तीन पिढयांसाठी तीन पिढयांसाठी 'नाते असलेला 'नाते आपुले षतकाचे' या पुरस्कारांचे वितरणही यावेळी आपुले षतकाचे' पुरस्कार करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र व पुश्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

महिलादिनाच्या निमित्ताने महिलांकरिता विविध स्पर्धा यावेळी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेस महिला कर्मचारी वर्गाने भरघोस प्रतिसाद दिला. बँकेच्या संचालिका अनुराधा गडाळे यांच्या संकल्पनेतून महिलादिनाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर समारंभाप्रसंगी उपाध्यक्ष श्री. प्रवीणकुमार गांधी, व्यवस्थापकीय संचालिका सौ. अपेक्षिता ठिपसे व संचालक मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. सौ. प्राची घोटकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# हिंदू जनजागृती समितीची साताऱ्यात निदर्शने

**सातारा** : भारताविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी गजवा ए हिंद फतवा देणाऱ्या दारुल उलुम देवबंद या संघटनेवर तात्काळ बंदी आणावी आणि त्यांच्या देश विरोधी कारवाया कठोरपणे मोडून काढाव्यात या मागणीसाठी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आली

हिंदू महासभेचे उमेश गांधी, हिंदू जनजागृती समितीचे हेमंत सोनावणे ,जितेंद्र वाडकर, भक्ती डाफळे व इत्यादींनी या आंदोलनामध्ये सहभाग घेतला होता आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करून जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले

बंगालमधील राज्य पाहता तेथे तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करण्यात यावी, तसेच सोनई तालुका नेवासा जिल्हा नगर येथील विनीयार्ड ब्लेस रिचार्ज मध्ये अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या तीन इसमांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भारताविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी गजवा ए हिंद फतवा देणाऱ्या दारुल उलुम देवबंद या संघटनेवर तात्काळ बंदी घालण्यात यावी अशा मागणी यावेळी करण्यात आल्या तसेच

केंद्रीय पुरातत्व खात्याच्या अंतर्गत संरक्षित हिंदू धार्मिक स्थळांमध्ये पूजेची अनुमती मिळावी धार्मिक स्थळांवर अतिक्रमणे हटवणे प्रवेश शुल्क रहित करणे अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या या मागण्यांकडे निदर्शनाद्वारे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

## सह्याद्रिच्यावतीने आज वाठार किरोलीला शेतकरी परिसंवादाचे आयोजन

**मसूर** : माजी उपप्रंतप्रधान स्व यशवंतराव चव्हाण यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त आज सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्यावतीने वाठारकिरोली ता कोरेगाव येथे श्रीराम लॉन (मल्टीपर्पज हॉल) या ठिकाणी दुपारी ३ वाजता शेतकरी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी सहकार व पणन मंत्री आ. बाळासाहेब पाटील, व्हॉईस चेअरमन लक्ष्मीताई गायकवाड व सर्व संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शेतकरी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. अभिनंदन पाटील, ऍग्रोनॉमिस्ट व्हीएसआय पुणे यांचे लागण व खोडवा ऊस व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.या शेतकरी परीसंवादास सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संचालक मंडळाच्यावतीने कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले आहे.

माजी उपपंतप्रधान 'सह्याद्रि'चे स्फूर्तीस्थान स्व यशवंतराव चव्हाण यांचा १२ मार्च हा जयंतीदिन सह्याद्रि कारखान्याच्यावतीने कार्यस्थळावर शेतकरी परिसंवाद, कृषी मेळावे, शिबिर अशा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येतो. गतवर्षी पासून कारखान्याच्या विविध विभागीय शेती कार्यालयांच्या कार्यकक्षेत शेतकरी परिसंवाद आयोजित करण्याचे धोरण ठरवण्यात आले आहे.

दरम्यान सह्याद्रि सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सकाळी १० वाजता सर्व अधिकारी, कर्मचारी अभिवादन करणार आहेत.

## चंदननगर येथून युवती बेपत्ता

**सातारा** : चंदननगर (कोडोली, ता. सातारा) येथील राहत्या घरातून राधा सुनील मचारे (वय ३०) ही शिवण क्लासला जाते असे सांगून दि. ९ रोजी रात्री ७.३८ वाजता निघून गेली आहे. ती अद्यापपर्यंत परत आली नाही. याबाबत सुनील शिवलाल मचारे (वय ३५, रा. चंदननगर) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस नाईक सूर्यवंशी तपास करत आहेत.

# मोदींची गॅरंटी विरोधात जनतेची गॅरंटी ही निवडणुकीची लढाई : आ.शशिकांत शिंदे

**सातारा** : भारतीय जनता पक्ष विरोधी सर्वत्र वातावरण निर्माण झाले आहे. राजकीय पक्ष सुद्धा कंटाळलेले आहेत. त्यामुळे मोदी की गॅरंटी विरोधात जनतेची गॅरंटी म्हणून महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येतील. असा सार्थ विश्वास महाविकास आघाडीचे घटक पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आमदार शशिकांत शिंदे यांनी सातारा येथे झालेल्या महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत केले.

या वेळेला राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर सुरेश जाधव, शिवसेनेचे सचिन मोहिते, शहर सुधार समितीचे असलम तडसरकर ,काँग्रेसचे नरेश देसाई, उदयसिंह पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, सरचिटणीस राजकुमार पाटील, उदयसिंह पाटील उंडाळकर, संजना जगदाळे, युवक जिल्हाध्यक्ष अतुल शिंदे , माणिक अवघडे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाविकास आघाडीच्या आतापर्यंत चार बैठक्या झाल्या असून समन्वय समिती स्थापन केलेली आहे. वॉर रूम, मीडिया समिती आधी समिती गठीत झाली आहे . स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त १२ मार्च रोजी शिवतीर्थ या ठिकाणी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून महाविकास आघाडीचे प्राचार्य यंत्रणा सुरू करण्यात येणार आहे.

निर्भय बनो आंदोलनाच्या विचारवंतांनाही यामध्ये सहभागी करण्यात आलेले आहे.

सध्या भाजपच्या रणनीतीचा पडदा फास करण्यासाठी पक्ष विरहित लढा सुरू झालेला आहे . मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. तालुकानिहाय बैठक होत असून त्याला उदंड प्रतिसाद मिळत आहे. ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई असून लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी वज्रमुठ निर्माण झालेली आहे.

भारतीय जनता पक्ष सत्तेच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेचा वापर करत आहे .महायुती ही सत्ता आल्यापासून दबावतंत्र सुरू झाले असून आम्ही त्या विरोधात आवाज उठवत आहे. महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ जागांच्या उमेदवारांची घोषणा वरिष्ठ पातळीवर चर्चा करूनच घेतली जाईल. आमच्या मध्ये कोणतेही मतभेद नसून प्रत्येकाला भूमिका मांडण्याचा अधिकार महाविकास आघाडीमध्ये आहे. त्यामुळे सध्या वंचित आघाडीशी समन्वय झाल्यानंतरच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार जाहीर करण्यास कोणती अडचण येणार नाही. असेही प्रमुख वक्त्यांनी स्पष्ट केले.

खरी लढाई ही महाविकास आघाडी विरोधात महायुती अशीच असून मताची विभागणी टाळण्यासाठी मतदारांनी ही निवडणूक हातात घेतलेली आहे. भारतीय जनता पक्षाला जनतेचा कौल कळल्यामुळे ते उमेदवारी जाहीर करण्यास विलंब करत आहेत . मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल आदर असून मराठा समाजाला कोणी फसवले? याचा आता मराठा मतदारांनी शोध घ्यावा. महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४५ जागा निवडून येऊ शकतील. असे महायुती सांगते मग ३ जागेवर ते का दावा करत नाहीत ? त्यांचा ४५ जागा निवडून येण्याची भूमिका ही हास्यस्पद आहे . त्यांचा ओव्हर कॉन्फिडन्स भाजप ला मारक ठरेल. असे ही स्पष्ट केले.

# सातारा जिल्ह्यातील ३२ मंदिरांमध्ये वस्त्र संहिता लागू

## महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट यांची माहिती

**सातारा** : महाराष्ट्रातील ४५७ तर सातारा जिल्ह्यातील ३२ मंदिरामध्ये वस्त्र संहिता लागू करण्यात आली आहे याची माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली येथील समर्थ सदन परिसरात त्यांनी मंदिर महासंघाची भूमिका मांडली यावेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हा निमंत्रक व चौंडेश्वरी माता मंदिर चे विश्वस्त दत्तात्रय कुलकर्णी महालक्ष्मी देवस्थान भोईंचे गजानन भोसले अधिवक्ता दत्तात्रय सणस हिंदू जनजागृती समितीच्या रूपा महाडिक सातारा जिल्हा समन्वयक हेमंत सोनवणे इत्यादी यावेळी उपस्थित होते.

सुनील घनवट पुढे म्हणाले ५ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेमध्ये महाराष्ट्र मंदिर महासंघाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्यात ४५७ मंदिरामध्ये वस्त्र संहिता लागू करण्यात आली. संपूर्ण शरीर झाकणारा पोशाख हा मंदिरांसाठी वस्त्र संहिता असेल बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले उज्जैनचे महाकालेश्वर महाराष्ट्रातील घृष्णेश्वर, वाराणसीचे श्री काशी विश्वेश्वर, आंध्रप्रदेशचे तिरुपती बालाजी, केरळचे विख्यात पदनाभमं स्वामी मंदिर, कन्याकुमारी माता मंदिर ओडिसा येथील जगन्नाथ मंदिर अशा काही प्रसिद्ध मंदिरांमध्ये अनेक वर्षांपासून भाविकांसाठी सात्विक वस्त्र संहिता लागू आहे गोव्यातील बहुतांश मंदिरांमध्ये बेसिलिका ऑफ जीझस सी कॅथ्रेडल चर्चमध्ये सुद्धा ही वस्त्र संहिता लागू आहे महाराष्ट्र शासन आणि शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना जीन्स पॅन्ट टी-शर्ट भडक रंगाचे नक्षीकाम केलेले वस्त्र तसेच स्लीपर वापरणार बंदी केली आहे

मद्रास उच्च न्यायालयाने तेथील मंदिरामध्ये प्रवेश करण्यासाठी सात्विक वेशभूषा असली पाहिजे हे मान्य करून १ जानेवारी २०१६ पासून राज्यात वस्त्र संहिता लागू केली आहे मंदिरामध्ये सात्विक ऊर्जा जागवण्याची शक्ती असते त्या शक्तीच्या प्रवाहासाठी सात्विक पोशाख असते गरजेचे आहे हिंदू संस्कृतीमध्ये या संदर्भामध्ये मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत या संदर्भात महाराष्ट्रात सर्व मंदिर समन्वयक संस्थानांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे घनवट यांनी सांगितले

महाराष्ट्रातील ४५७ तर सातारा जिल्ह्यातील ३२ जिल्ह्यांमध्ये हा निर्णय लागू करण्यात आलेला आहे तसेच सातारा जिल्ह्यातील अन्य मंदिर विश्वशांती याबाबत चर्चा असून सातारा जिल्ह्यातील बहुसंख्य मंदिरांमध्ये लवकरच टप्प्याटप्प्याने वस्त्र संहिता लागू होणार असल्याचा दावा घनवट यांनी यावेळी केला.

### वस्त्र संहिता लागू झालेली मंदिरे खालील प्रमाणे

**सातारा शहर**

**दुर्गा माता मंदिर पंचपळे हौद राजवाडा, बहुलेश्वर मंदिर व्यंकटपुरा, कृष्णेश्वर मंदिर, अजिंक्य गणेश मंदिर राजवाडा ,महाकालीका मंदिर देवी चौक, शनी मंदिर पाचशे पाटी, प्रताप मारुती मंदिर प्रतापगंजपेठ भैरवनाथ मंदिर करंजे, कोटेश्वर मंदिर शुक्रवार पेठ, मारुती मंदिर मेघदूत कॉलनी, गणेश मंदिर आशीर्वाद कॉलनी संभाजीनगर, विसावा मारुती विसावा नाका**

**वाई**

**भद्रेश्वर शिवमंदिर, महालक्ष्मी मंदिर भुईंज, मारुती मंदिर भुईंज ,खंडोबा मंदिर भुईंज, महादेव मंदिर भुईंज ,महर्षी भृगूऋषी मंदिर भुईंज, एकविरा माता मंदिर भुईंज, भवानी माता मंदिर भुईंज, श्री राम मंदिर भुईज, श्री चिलाई देवी मंदिर जांब ,श्री भैरवनाथ मंदिर जांब**

**सातारा तालुका**

**चौंडेश्वरी माता मंदिर नागठाणे सातारा ,यवतेश्वर महादेव मंदिर सातारा**

**कराड तालुका**

**श्री भैरवनाथ मंदिर मसूर, श्री अंबामाता मंदिर कराड, श्री हनुमान मंदिर कराड, श्री विठ्ठल मंदिर कराड, श्रीराम मंदिर कराड, समर्थ स्थापित हनुमान मंदिर, कराड वडूज तालुका श्रीनाथ मंदिर.**

# आ. गोरेंनी दहिवडीकरांना दिलेला शब्द पाळला!

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून भटकीमळा रस्त्यास पाऊनेतीन कोटी



**दहिवडी** : दहिवडी ता. माण येथील प्रतिक्षेत असणाऱ्या गोंदवले रस्ता ते भटकीमळा या रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा माण खटावचे आमदार जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते कोनशीला अनावर करून संपन्न झाला.दरम्यान आ.गोरे यांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीसह त्यांचे स्वागत करण्यात आले.

ग्रामविकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ (संशोधन व विकास) यांच्या अंतर्गत मंजूर झालेल्या प्रतिमा ५० ते भटकी मळा रस्ता सा क्र ०/००० ते ३/३२० रस्ता सुधारण्याकरीता २ कोटी ८७ लाख ६० हजार गेल्या सहा महिन्यापूर्वी मंजूर झाले होते.

जवळपास २०२५ वर्षापासून भटकीमळा वासीय रस्त्याच्या प्रतिक्षेत होते.या रस्त्याच्या मंजुरीस अनेक अडचणी येत होत्या,परंतु आ.जयकुमार गोरे यांनी प्रयत्न करून रस्त्यास मंजूर आणली.

या सोहळ्यास सौ सोनिया गोरे, श्री.सिद्धनाथ पतसंस्थेचे चेअरमन अरुण गोरे, आय. आय.एस. तुषार जाधव, नगरसेवक धनाजी जाधव, अतुल जाधव, सिद्धार्थ गुंडगे, अतुल शिंदे यांच्यासह पंचक्रोशीतील पदाधिकारी उपस्थित होते.

भटकी मळा रोड जवळपास २०-२५ वर्षापासून अपूर्ण आहे. दहिवडी शहरापासून आम्ही तीन ते चार किलोमीटर अंतरावर वास्तव्यास आहे.

बऱ्याच राजकारण्यांनी या रस्त्याचे राजकारण करून आमची मते घेतली,परंतु काही दिवसापूर्वी आमदार साहेबांनी स्वतः लक्ष घातले व मतदार संघापासून मंत्रालयापर्यंत पायाला भिंगरी बांधून रस्ता मंजूर करून आणला.

# साध्या स्टॅम्पवरील करारामुळे वाढते गुन्हेगारी मालकांकडून गैरव्यवहार सुरू

## घरमालकांनी भाडेकरूची चौकशी करावी । उपनगरात सूरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**बाणेर, बालेवाडी** : बाणेर,बालेवाडी,पाषाण,सुस,औध विभागात अनेक बांधकामे सुरू आहे अनेक कामगार या विभागात घर भाड्याने घेऊन राहतात घर भाड्याने देणारे जागा मालक कोणताही कराणामा न करता घर, दुकाने भाड्याने देतांना दिसत आहे यामुळे या विभागात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे

बिहार,पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश , झारखंड अशा अनेक ठिकाणचे कामगार मजूर,दूकान,व्यावसायिक, भंगार गोळा करणारे खोल्या भाड्याने घेतात भाडेतत्वावर राहणारे कोण कोठून आले त्यांची पार्श्वभूमी घेणे आवश्यक असूनही आपल्याला भाडे कसे मिळेल या हव्यासापोटी मालक खोल्या भाड्याने देत असल्याचे धक्कादायक चित्र या विभागात दिसून येत आहे उत्पन्न लपविण्या करिता संबंधित जागा मालकाकडून भाडे करार तोंडी केला जातो शासनाच्या नियमानूसार केला जात नाही काही वेळेस १०० किंवा ५०० रूपयाचे







स्टॅम्प पेपरवर साधे लिखाण करून घेऊन घर किंवा दुकाने भाड्याने दिल्या जातात परराज्यातून येणारे कामगार,

मजूर आणि अन्य व्यवसाय करणारे या विभागात फार राहतात भाडे करार कसा करावा ,कोठे करावा किंवा कोणते कागदपत्रे लागतात याची माहीती नसते फक्त भाडेकरार नियमाने केल्यास जास्त खर्च येतो अशा भावना त्यांच्या मनात जागा मालक बिंबवतात याचाच फायदा घर मालक घेतांना दिसत आहे याची कल्पना पोलिसांना असते तेही याचा फायदा घेत घर मालकाकडून हप्ते घेउन चूप बसतात हे अत्यंत घातक आहे परराज्यातून येणारे गून्हेगार आहे का? याची पडताळणी सूध्दा केली जात नाही औध,सुस,बाणेर,बालेवाडी विभागात घर भाड्याने सहज मिळते याची जाणीव गून्हेगार वृतीच्या लोकांना माहीती मिळते भाडेतत्वावर घरे,दूकाने दिलेल्या लोकांना नळ कनेक्शन, वीज मीटर सहज मिळते या लोकांना सूविधा कशा दिल्या जातात हा संशोधनाचा विषय आहे यात पोलीस,एम एसईबी,महानगरपालीका अधिकारी हात धूऊन घेत असल्याचे सुत्राकडून समजते साधे टिन पत्रे उभारून घरे ,दूकाने भाड्याने दिल्या जातात हे चित्र मनपांच्या अधिकारी यांना दिसत नाही काय? यामूळे सर्व मूभा जागा मालकांना दिल्याचे दिसते कर भरावा लागतो म्हणून घरे,दूकानांचा भाडे करार नियमानूसार होत नाही हा प्रकार या भागात राजेरोसपणे सूरू आहे

यावर कोणतेही आणि कोणाचेही बंधन नाही घर मालकांना भाडे भरपूर मिळते ते फक्त भाडे कसे मिळेल या नांदात घरे भाड्याने देत आहे पण याचा गंभीर परिणाम म्हणजे वेशाव्यवसाय करणारे सूध्दा येथे राहत असल्याचे निर्दशनात येत आहे मोठे गून्हेगार सुध्दा राहत असतील याची कल्पना पोलीस विभागाला नसू शकते ? घर,दूकाने भाड्याने देत असतांना करारनामा नियमा नूसार केला की नाही आणि कोठले भाडेकरू राहतात याची नोंद स्थानिक पोलीस स्टेशनला द्यावे लागते पण हे नियमाने नसल्यामूळे आणि उत्पन्न लपविण्याच्या नांदात किंवा हप्ते गोळा करण्याच्या नांदात एखादा गुन्हा घडला की मग यंत्रणा जागी होते पोलीस यंत्रणा आणि जागा मालकांकडून अघोरी प्रकार सूरू आहे असल्या कर बूडव्या मालकावर वरिष्ट पोलीस अधिकारी यांनी कारवाई करणेच योग्य ठरेल

घर,दूकाने भाड्याने देण्याआधीच योग्य काळजी नक्की घ्यायला हवी गून्हेगार प्रवृतीचे लोकांना घर भाड्याने दिल्यास आणि घाईघाईत घेतलेला निर्णय नंतर संघर्षाला सामोरे जावे लागते शहरातील उपनगरामध्ये मोठ्या प्रमाणात परराज्यांतील कामगार राहत आहे शिक्षण, नोकरी ,घरकाम,व्यवसाईक ,ईतर कामगार जागा भाड्याने घेऊन वास्तव्य करतात परंतू काही अपप्रवृत्तीचे नागरिक भाडेतत्वावर राहतात येथे गून्हा करतात आणि निघून जातात नियमानूसार भाडे करार करणे आणि या भाडेकरूची नोंद पोलीस स्टेशनला करणे बंधनकारक असूनही अद्याप नागरिकांनी याला फारसा प्रतिसाद दिलेला दिसत नाही जागा मालक रिकाम्या प्लाटवर अनेक ठिकाणी भिंती किंवा टिनशेड उभारून भाडे तत्वावर किराणा दूकाने,चिकन दूकान पान टपरी,भंगार खरेदी व्यवसाईक, घरे शेड उभारून भाड्याने देण्याचे प्रस्त या विभागात वाढत आहे

शहरात सोसाखळीचोर,दुचाकी चोरटे,बेकायदेशीर शस्त्रांची विक्री करणारे,अमली पदार्थ विकणारे यांच्यावर कारवाई केली जात आहे म्हणून हे गून्हेगारी करणारे आता उपनगरात राहण्या करिता धाव घेतांना दिसतात ही बाब समोर आली तर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणार ही बाब निच्छित उपनगरात मोठ्या प्रमाणात घरे नियमाने भाडे करार न करता भाड्याने दिली जात आहे यावर पोलीसांनी तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे घरमालकांनी घरे किंवा दुकाने भाड्याने दिल्या नंतर स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये भाडे करूचे व्हेरिफिकेशन बंधनकारक आहे हे न केल्यास इंडियन पिनल कोडमधील कलम १८८ नुसार हा शिक्षेस पात्र गुन्हा ठरू शकतो घरमालकांना पोलीस व्हेरिफिकेशन फॉर्ममध्ये भाडे करूचा तपशिल भरावयाचा असतो या फार्मवर फोटोसोबत कागदपत्रे म्हणजे पॅनकार्ड, आधार कार्ड भाडेकरार ,पत्याचा पुरावा प्रत स्थानिक पोलीस स्टेशनला द्यावी